महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ ३० मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३३१ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पत्रकार हवे आहेत**

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा



दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com


# जिथे जुळणार नाही; तिथे मैत्रिपूर्ण लढत


## - चंद्रशेखर बावनकुळे यांचं सूचक वक्तव्य

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचं वारं वाहू लागलं आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांकडून निवडणुकीची तयारी देखील सुरू झाली आहे, मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती म्हणून लढवल्या जाणार की? स्वबळावर लढणार याबाबत आता मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. यावर आता मंत्री आणि भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. 'महायुतीमध्येचं निवडणुका होतील पण ज्याठिकाणी जुळणार नाही त्याठिकाणी मैत्रिपूर्ण लढत होईल, त्यानंतर पुन्हा एकत्रित येऊ' असं बावनकुळे यांनी म्हटलं आहे.

निवडणूक घेण्याचे अधिकार हे आयोगाला आहेत, आयोग जेव्हा निवडणूक घेईल तेव्हा सरकार म्हणून यंत्रणा तयार आहे. भाजप म्हणून देखील आम्ही सक्षमपणे तयार आहोत. निवडणुकांमधून आम्ही काही गोष्टी शिकतो, लोकसभा निवडणुकीतून काही गोष्टी आम्ही शिकलो, त्यानंतर चारच महिन्यांमध्ये विधानसभा निवडणूक आम्ही जिंकली, जिंकणे हरणे या लढाईत न जाता आम्ही जनतेचं काम करत आहोत, असं बावनकुळे यांनी यावेळी म्हटलं.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी वाळू धोरणावर देखील प्रतिक्रिया दिली आहे. वाळूमाफियांना रोखण्यासाठी नवीन वाळू धोरण आम्ही आणलं आहे. अनेकजनांचे मंत्र्यांशी वगैरे संबंध असतात, वाळू संदर्भात तर काही जण अधिकाऱ्यांना थेट माझं देखील नाव सांगतात. पण माझा फोन जरी आला तरी चुकीच्या कामाला नाही म्हणा, अशा सूचना मी अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. पुढच्या 3 वर्षांत वाळू माफिया आणि वाळू संदर्भातले सर्व महत्वाचे प्रश्न संपलेले असतील, असं यावेळी बावनकुळे यांनी म्हटलं आहे.



**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. महायुतीमध्येचं निवडणुका होतील पण ज्याठिकाणी जुळणार नाही त्याठिकाणी मैत्रिपूर्ण लढत होईल, त्यानंतर पुन्हा एकत्रित येऊ, असं बावनकुळे यांनी म्हटलं आहे, दरम्यान याचा अर्थ महायुतीमध्ये प्रॉब्लेम आहे, असा होत नाही - चंद्रशेखर बावनकुळे**

# ठाण्यात पाकिस्तान गुप्तहेर अटकेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मुंबई जवळच्या ठाण्यातून पाकिस्तानच्या एका गुप्तहेराला अटक करण्यात आली आहे. भारतातली संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवल्याचा आरोप अटक केलेल्या हेरावर आहे. या गुप्तहेराला महाराष्ट्र पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) अटक केली आहे.

आरोपी मुंबईतील एका महत्त्वाच्या संस्थेसाठी काम करत होता आणि एका पाकिस्तानी एजंटने त्याला 'हनीट्रॅप'मध्ये अडकवले होते. पाकिस्तानी एजंटने फेसबुकवर महिला असल्याचे भासवून आरोपीशी मैत्री केली होती. आरोपीने नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत व्हॉट्सअॅपद्वारे एका 'पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणे'ला एका महत्त्वाच्या आस्थापनेबद्दलची संवेदनशील माहिती शेअर केली होती.

खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीआधारे एटीएसच्या ठाणे शाखेने आरोपीला इतर दोघांसह ताब्यात घेतले. सुरुवातीच्या चौकशीनंतर, त्या व्यक्तीला अधिकृत गुपित कायद्याच्या कलम ३ (जे हेरगिरीशी संबंधित आहे) आणि भारतीय न्याय संहितेच्या कलम ६१ (२) (गुन्हेगारी कट) अंतर्गत अटक करण्यात आली. ताब्यात घेतलेल्या इतर दोघांना चौकशीनंतर सोडून देण्यात आले. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.




## भिवंडी मनपा आयुक्तांनी केली
# मान्सून पूर्व कामांची पाहणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** काल झालेल्या पावसामुळे शहरामध्ये काही ठिकाणी पाणी साचल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुषंगाने आयुक्तांनी आज शहरातील विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी केली. यामध्ये प्रामुख्याने नाले सफाईची पहाणी, मॉन्सुनपुर्व तयारीचा आढावा यांचा समावेश होता. आज आयुक्तांनी प्रभाग समिती क्र. 4 येथील काकूबाई चाळ, आझमी नगर, मुख्य रस्त्यावरील टोरेंट ऑफिस येथील नाल्याची पहाणी, तर प्रभाग समिती क्र. 2 मधील गोपाल नगर, साईबाबा, रांजणोली नाका टाटा आमंत्रा येथील नाल्याची पहाणी केली. तद्नंतर प्रभाग समिती क्र. 1 व 5 मधील मेट्रो हॉटेलजवळील नाल्याची देखील पहाणी केली. तसेच, प्रत्येक वर्षी पावसाळ्यात गोपाळ नगर, कल्याण नाका, म्हाडा कॉलनी, चाविंद्रा नाका या ठिकाणी पाणी भरण्याची शक्यता असते, अशा ठिकाणांना भेट देऊन पाणी साचणार नाही याकरिता आवश्यक त्या सुचना संबंधितांना दिल्या. याप्रसंगी मा. उपायुक्त (आरोग्य) श्री. विक्रम दराडे, शहर अभियंता श्री. जमील पटेल, बांधकाम अतिरिक्त शहर अभियंता श्री. सचिन नाईक, उपअभियंता (बांधकाम) श्री. हरेश म्हात्रे, आरोग्य विभाग प्रमुख श्री. फैसल तातली, प्रभाग अधिकारी श्री. मकसुम शेख, श्री. गिरीष घोष्टेकर, श्री. बाळाराम जाधव, मुख्य आरोग्य अधिकारी श्री. जे. एम. सोनावणे, श्री. हरेष भंडारे आणि अन्य कर्मचारी उपस्थित होते.

## कल्याण डोंबिवली मनपा हद्दीतील
# विद्यार्थ्यांना मिळणार पहिल्या दिवशीच पुस्तके
## - उपायुक्त संजय जाधव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील २८० महापालिका, खासगी शाळांमधील ६३ हजार इयत्ता पहिली ते दहावीमधील विद्यार्थ्यांना जूनमध्ये शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी क्रमिक अभ्यासक्रमांची पुस्तके देण्याचे नियोजन शासनाच्या सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने केले आहे, अशी माहिती कल्याण डोंबिवली पालिका शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी दिली.

जूनमध्ये शाळा सुरू झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेच्या पहिल्या दिवशी आपल्याकडे आपण शिक्षण घेणाऱ्या इयत्तेचे पुस्तक असावे असे वाटते. ही पुस्तके वेळेत मिळाली नाही की मग विद्यार्थी आपल्या पालकांना पुस्तकांसाठी तगादा लावतात. हे प्रकार टाळण्यासाठी शासनाच्या सर्व शिक्षा अभियानातून कल्याण डोंबिवली पालिकेकडे तीन लाख ७० हजार पुस्तके दाखल झाली आहेत. ही पुस्तके इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आहेत.

## उल्हास नदीच्या पुरात
# वाहून गेलं मांजर्ली गावातील शेतकऱ्याचं हिरवं सोनं



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा:** कल्याण तालुक्यात उल्हास नदीला आलेल्या अचानक पुरामुळे शेतकऱ्यांवर संकट कोसळले आहे. मांजर्ली गावातील शेतकरी बाबू गायकर यांच्या शेतातील सव्वाशे किलो भेंडी पुराच्या पाण्यात बाहुन गेल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. बाजारात विक्रीसाठी काढून ठेवलेली ही भेंडी संपूर्ण नष्ट झाल्यामुळे गायकर कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.

बाबू गायकर यांनी सांगितले की, खूप मेहनत करून भेंडी पिकवली होती. बाजारात नेण्यासाठी सकाळीच खुडून ठेवली होती. पण, दुपारी अचानक नदीला पूर आला आणि सगळं पीक पाण्यात वाहून गेलं. घरातून कसाबसा जीव वाचवून बाहेर पडलो. मेहनतीचे फळ डोळ्यांदेखत वाहून गेलं. पाण्यात पूर्ण बुडालेली भेंडी आता चिखलात गेल्याने ती विकण्यालायक राहिली नाही. याशिवाय त्यांच्या शेतातील अन्य पिकांनाही मोठा फटका बसला आहे. काही दिवसांपूर्वीच शेतात गुंतवणूक करून खतं आणि औषधं टाकली होती, ती सर्व मेहनत पाण्यात गेली आहे.

# ठाणे महापालिकेसाठी भाजपचा स्वबळाचा नारा ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** कल्याण, ठाणे आणि नवी मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेना आणि राष्ट्रवादी जास्त जागांची मागणी करत असल्याने भारतीय जनता पक्षाने स्वबळावर निवडणुका लढण्याची चाचपणी सुरु केली आहे. त्यामुळे राज्यात महायुती असली तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मात्र 'एकला चलो रे' ची भूमिका महायुतीचे पक्ष घेणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सप्टेंबर ते नोव्हेंबर दरम्यान होण्याची शक्यता असून सर्वच राजकीय पक्षांनी या निवडणुकीकरिता कंबर कसली आहे. या निवडणुकीत महायुतीच्या पक्षांनी एकत्रित निवडणूक लढविण्याची भूमिका घेतली असली तरी शिवसेनेने मुंबई, ठाणे, कल्याण आणि नवी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत जास्त जागा मागण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर काल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुंबई येथे आले असताना भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी भाजपा आणि महायुतीमधील नेत्यांची भूमिका स्पष्ट केली होती. मित्रपक्ष जर त्यांच्या ताकदीपेक्षा जास्त जागा मागत असतील तर स्वबळावर निवडणूक लढण्याची चाचपणी करावी, असा सूर भाजपामधून आला आहे. त्या दृष्टीने ठाणे, कल्याण आणि नवी मुंबई या महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याबाबत चाचपणी करावी, अशा सूचना भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी दिल्याचे समजते.



ठाणे महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढवावी, अशी मागणी स्थानिक पदाधिकारी करत आहेत तसेच नवी मुंबईची निवडणूक देखिल एकट्याने लढावी अशी भूमिका वनमंत्री गणेश नाईक यांनी वारंवार मांडली आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेचे रविंद्र चव्हाण देखिल 'एकला चलो रे' या भूमिकेवर ठाम असल्याने या महापालिका निवडणुकीत महायुतीमधील घटकपक्ष स्वबळावर निवडणूक लढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**राज्यातील २९ महापालिका, नगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि काही ग्रामपंचायत यांच्या निवडणुका मागील तीन ते पाच वर्षे रखडल्या असून या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार प्रशासनाच्या हातात आहे, त्यामुळे नागरिकांचे प्रश्न सोडवले जात नसल्याची ओरड सुरु असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर घेण्याची मागणी केली जात आहे.**










# गीतासार



### अध्याय १२
## भक्तियोग:

अर्जुन उवाच एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते । ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १२-१ ॥

अर्जुन म्हणाला, जे अनन्यप्रेमी भक्तजन पूर्वी सांगितलेल्या आपल्या भजन, ध्यानात निरंतर मग्न राहून आपणा सगुणरूप परमेश्वराची आणि दुसरे जे केवळ अविनाशी सच्चिदानंदघन निराकार ब्रह्माचीच अतिश्रेष्ठ भावाने उपासना करतात, त्या दोन्ही प्रकारच्या भक्तांमध्ये अतिशय उत्तम योगवेत्ते कोण होत? ॥ १२-१ ॥


श्रीभगवानुवाच मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते । श्रद्धा परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ १२-२ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, माझ्या ठिकाणी मन एकाग्र करून निरंतर माझ्या भजन, ध्यानात रत झालेले जे भक्तजन अतिशय श्रेष्ठ श्रद्धेने युक्त होऊन मज सगुणरूप परमेश्वराला भजतात, ते मला योग्यांमधील अतिउत्तम योगी वाटतात. ॥ १२-२ ॥

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते । सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ १२-३ ॥
सन्नियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः । ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ १२-४ ॥

परंतु जे पुरुष इंद्रियसमूहाला चांगल्या प्रकारे ताब्यात ठेवून मन, बुद्धीच्या पलीकडे असणाऱ्या, सर्वव्यापी, अवर्णनीय स्वरूप आणि नेहमी एकरूप असणाऱ्या नित्य, अचल, निराकार, अविनाशी, सच्चिदानंदघन ब्रह्माची निरंतर ऐक्यभावनेने ध्यान करीत उपासना करतात, ते सर्व भूतमात्रांच्या कल्याणात तत्पर आणि सर्वांच्या ठिकाणी समान भाव ठेवणारे योगी मलाच येऊन मिळतात. ॥ १२-३, १२-४ ॥

# शिक्षणतज्ज्ञ : डॉ. झाकीर हुसेन



डॉ. झाकीर हुसेन यांचे गांधीजी हे खरेखुरे स्फूर्तिस्थान होते. शिक्षण पद्धती कशा प्रकारची असावी, या बाबत गांधीजींचे विचार अन्य शिक्षणतज्ज्ञांहून काहीसे निराळे होते. त्यामुळे 'जामिया मिलिया'च्या स्थापनेपासूनच त्यांनी स्वयंशिक्षण पद्धतीवर भर दिला होता. नवनवीन कल्पनाही त्यांनी राबविल्या. कुटिरोद्योग, मूलोद्योग, प्रौढशिक्षण इत्यादी गांधीजींना अभिप्रेत असलेल्या शिक्षणप्रणालींचा अंमल डॉ. झाकीर हुसेन यांच्याकडून मुक्तपणे आणि विचारपूर्वक होत असे. त्यामुळे गांधीजींना डॉ. झाकीर हुसेन यांच्याबद्दल विशेष आस्था वाटत असे. आपल्या या शैक्षणिक विचारप्रणालीला राष्ट्रीय स्तरावर राबविले पाहिजे, या हेतूने भारतातील शिक्षणक्षेत्रात कार्य करणाऱ्या तज्ज्ञ लोकांची एक समिती निर्माण करण्यात आली होती. 'राष्ट्रीय मूलोद्योग समिती' हे या समितीचे नाव होते. १९३७ पासून या समितीचे कार्य सुरू झाले. डॉ. झाकीर हुसेन यांच्याकडे गांधीजींनी या समितीचे अध्यक्षपद सोपविले. या समितीने विविध योजना आखल्या. प्रचारासाठी राष्ट्रव्यापी दौरे आयोजित केले. 'नई तालीम' या नावाचे एक मासिक सुरू केले. त्याद्वारेही प्रचार कार्य चालू ठेवले. पण नुसता प्रचार करून झाकीर हुसेन थांबले नाहीत. महात्माजींच्या या कल्पनेनुसार कार्य करणाऱ्या व शिक्षण देणाऱ्या संस्था ठिकठिकाणी कार्यरत करण्यात आल्या. गांधीजींची कल्पनाशक्ती आणि डॉ. झाकीर हुसेन यांचे प्रयत्न याद्वारे 'राष्ट्रीय मूलोद्योग'चे कार्य लवकरच फलद्रूप झाले. 'अग्रगण्य भारतीय शिक्षणतज्ज्ञ' म्हणून झाकीर हुसेन यांच्याकडे भारतीय नेतेमंडळी मोठ्या आशेने आणि अपेक्षेने पाहू लागली. जवाहरलाल नेहरूंनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सौहार्दाचे व शांततेचे संबंध प्रस्थापित व्हावेत म्हणून जसे 'पंचशील' पुरस्कारले होते, तसेच शैक्षणिक क्षेत्रात 'परिवर्तनाचे पंचशील' डॉ. झाकीर हुसेननी मांडले. या आपल्या कल्पनेचे स्पष्टीकरण करताना ते म्हणतात, 'अध्ययन, संशोधन व काही मर्यादित क्षेत्रात नेतृत्व निर्मिती ही विद्यापीठांची तीन परंपरागत कार्ये मानली जातात, हे खरे. पण आता आधुनिक विद्यापीठांनी ती आणखी विस्तृत प्रमाणात करावीत. परंतु त्याच्याच जोडीने समाजाची सेवा व प्रौढ शिक्षण या दोन कार्यांची अधिक जोड द्यावी. भारतासारख्या देशात या कार्याचे फार महत्त्व आहे. देशातील सुशिक्षित तरुणवर्गातील उदासीनता नष्ट करून त्यांना लोकाभिमुख बनवील, अशा पद्धतीने शिक्षणाची पुनर्रचना केली पाहिजे. अशी पुनर्रचना केली तरच आपल्याला चिरस्थायी स्वरूपाची राष्ट्रीय पुनर्रचना करता येईल!'

### उपराष्ट्रपती व भारतरत्न

१९५७ ते १९६२ पर्यंत डॉ. झाकीर हुसेन बिहारचे राज्यपाल होते. या काळात डॉ. राजेंद्रप्रसाद हे राष्ट्रपती आणि डॉ. राधाकृष्णन् हे उपराष्ट्रपतीपदावर आरूढ झालेले होते. परंतु १९६२ साली राजेंद्रप्रसादांची राष्ट्रपतीपदाची मुदत संपणार होती. यापूर्वी २ वेळा राष्ट्रपती म्हणून निवड झाल्याने पुन्हा तिसऱ्यांदा राष्ट्रपती होण्यास राजेंद्रप्रसादांनी स्पष्ट नकार दिला. त्यांच्याजागी डॉ. राधाकृष्णन यांची राष्ट्रपती म्हणून निवड झाल्याने त्यांची उपराष्ट्रपतिपदाची जागा रिकामी झाली. या जागेवर १९६२ साली डॉ. झाकीर हुसेन यांची उपराष्ट्रपतिपदी निवड करण्यात आली. उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. त्यामुळे डॉ. झाकीर हुसेन यांच्यावर दुहेरी जबाबदारी येऊन पडली. त्यांच्या गुणवत्तेला २ नवीन क्षेत्रे मिळाली. राज्यसभेचे अध्यक्ष म्हणून काम करताना सत्ताधारी व विरोधक यांचा त्यांनी विश्वास संपादन केला. राज्यसभेचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांची वागणूक निःपक्षपाती व सौजन्याची असे.

डॉ. झाकीर हुसेन यांनी उपराष्ट्रपती म्हणून इथिओपिया, सुदान, युनायटेड अरब रिपब्लिकन (१९६३), जुलप्पोरिया, ट्युनिशिया आणि मोरोक्को (१९६४) आणि कुवेत, जॉर्डन, टर्की आणि ग्रीस (१९६५) या देशांना सदिच्छा भेटी दिल्या. ते अफगाणिस्तानात शासकीय दौऱ्यावर गेले असता त्यांचे जिवलग मित्र खान अब्दुल गफारखान (सरहद्द गांधी) यांच्याशी त्यांची भेट झाली होती (१९६६).

आपल्या उपराष्ट्रपतिपदाच्या ५ वर्षांच्या कारकिर्दीत विविध देशांना भेटी देऊन भारताचे निधर्मी (Secular) लोकशाहीवादी राजकारणच जगाला शांतता देऊ शकेल, हे त्यांनी आवर्जून सांगितले. भारतीय आणि बाहेरील विद्यापीठांनी त्यांना डी.लिट. पदवीने गौरवले होते. अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठाने त्याना 'डॉक्टर ऑफ लॉज' या पदवीने गौरवले. त्यावेळी तेथील खास पदवीदान समारंभात त्यांनी 'राष्ट्रवादाची जोपासन करणाऱ्या सरकारचे नैतिक कर्तव्य' या विषयावर विचार मांडले. ते म्हणाले, 'विचारी माणसे तयार केली पाहिजेत. अशीच माणसे राष्ट्रवादाची जोपासना करणाऱ्या सरकारला राजकीय सत्तेचा दुरुपयोग करण्यापासून वाचवू शकतील!'

अशा या गुणी व ज्ञानी माणसाने भारताची थोर अशी सेवा केली.

'यः क्रियावान् सः पंडीतः'

डॉ. झाकीर हुसेन यांची साधी राहणी व उच्च विचारसरणी होती, . लहान मुलांसाठी त्यांनी अनेक लहानमोठ्या व चटकदार गोष्टी लिहिल्या आहेत. त्यांच्या या गोष्टी मनोरंजनात्मक तर आहेतच, पण त्याबरोबरच बोधप्रदही आहेत. लहानपणी आम्ही हायस्कूलमध्ये शिकत असताना हिंदी पाठ्यपुस्तकांतील त्यांची 'अब्बूखाँ की बकरी' ही छोटीशी चटकदार गोष्ट वाचल्याचे आजही चांगले आठवते. लेखन, वाचनाप्रमाणे त्यांना इतरही बरेच छंद होते. पुराणवस्तू गोळा करणे, हस्ताक्षरे व पुस्तके यांचा संग्रह करणे अशा त्यांच्या इतरही काही आवडी होत्या. जुनी नाणी आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या वस्तू या वस्तूंच्या पुराणअवशेषांच्या संग्रहातून एक विलक्षण आनंद लाभतो, असे ते म्हणत. यंत्रज्ञान व तंत्रज्ञान यांना साहित्य, काव्य, मनोरंजन व संगीत यांची जोड मिळाल्याखेरीज मानवी व्यक्तित्वाचा खराखुरा विकास होणार नाही, असे त्यांचे मत होते.

शिक्षणाप्रमाणेच अर्थशास्त्र हा त्यांचा अत्यंत आवडीचा विषय होता. त्यांनी 'कॅपिटॅलिझम : ॲन एसे अंडरस्टैंडिंग', 'लेक्चर्स ऑन स्कोप अँड मेथड्स ऑफ इकॉनॉमिक्स,' 'डायनॅमिक युनिव्हर्सिटी', 'इकॉनॉमिक रिकन्स्ट्रक्शन इन इंडिया' इत्यादी अर्थशास्त्रविषयक पुस्तके लिहिली असून ती विद्वन्मान्य ठरली आहेत. प्लेटोचे ('Philosopher must be A King') हे स्वप्न राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी खरे करून दाखवले, तर प्लेटोच्या गाजलेल्या 'रिपब्लिक' या प्रसिद्ध ग्रंथाचे राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांनी उर्दूत भाषांतर केले. डॉ. झाकीर हुसेन हे गाढे पंडित पण केवळ पढिक पंडित नाहीत तर ते क्रियाशील पंडित होते, हे त्यांचे खास वैशिष्ट्य होते. 'यः क्रियावान् सः पंडितः' हेच त्यांचे यथार्थ वर्णन होय.

### भारताचे तिसरे राष्ट्रपति

१९६७ साली डॉ. राधाकृष्णन राष्ट्रपतिपदावरून निवृत्त झाले. त्यामुळे राष्ट्रपतिपदाची निवडणूक जाहीर झाली. १९६७ सालची राष्ट्रपतिपदाची निवडणूक ही जगात एक चर्चेची न उत्सुकतेची बाब होऊन राहिली. यापूर्वी डॉ. राजेंद्रप्रसाद व डॉ. राधाकृष्णन या दोघांनाही निवडणूक लढवावी लागली नाही. त्यांच्यावेळी काही नामधारी लोक जरी निवडणुकीला उभे राहिले असले, तरी त्यांची निवडणूक एकतर्फीच पार पडली होती. त्यावेळी दोरायस्वामी या तज्ज्ञ डॉक्टरांनाही बोलावण्यात आले, पण ते येण्यापूर्वीच डॉ. झाकीर हुसेन अल्लाला प्यारे झाले होते. राष्ट्रपतिपदावर काम करीत असताना राष्ट्रपती भवनातच मृत्यू पावणारे ते भारताचे पहिले राष्ट्रपती होते.

'महाराष्ट्राने केवळ गांधीजींचा मारेकरी निर्माण केला हे 'अर्धसत्य' आहे. याउलट महाराष्टाने गांधीजींना आपला गुरू दिला आणि शिष्योत्तमही दिला, ही गोष्ट कृतज्ञ भारत कदापि विसरणार नाही!'

राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांचे हे उद्गार आहेत आणि तेसुद्धा निष्कारण महाराष्ट्राची बदनामी करणाऱ्या शिक्षणक्षेत्रातील एका अधिकाऱ्यापुढे काढलेले आहेत, हे आपण विसरता कामा नये.

## शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे शाखेतर्फे
# बालनाट्यास प्रतिसाद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष कल्याण शहर तसेच उपनेते विजय साळवी यांच्या पुढाकाराने कल्याणच्या आचार्य - अत्रे नाट्यगृहात बाळ गोपाळांसाठी आयोजित करण्यात आलेल्या बाल नाटकास भर पावसातही बच्चे कंपनीने भरभरुन प्रतिसाद दिला. नाटकाच्या वेळेपूर्वीच नाट्यगृह तुडूंब भरले होते. ऐन सुट्टीत मोफत बाल नाट्य महोत्सव आयोजित केल्याने बालगोपाळांनी शिवसेनेला धन्यवाद दिले.

शिवसेना शाखेच्या वतीने मोफत तीन बालनाट्य मे महिन्याच्या सुट्टीत बाल दोस्ताना आनंद मिळावा यासाठी खास विनामूल्य बालनाटिकांस हजारो बालगोपाळांच्या उपस्थितीत उत्स्फूर्त प्रतिसादाने पार पडला. कल्याण पश्चिम-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षच्या कल्याण शहर शाखेच्यावतीने आचार्य प्रल्हाद केशव अत्रे रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आले होते. बालनाट्य बघायला आलेल्या बालगोपाळांसाठी पाण्याची बाटली, चॉकलेट, वडापाव, ज्यूस अल्पोपहार शिवसेना शाखेतर्फे देण्यात आला. तुडूंब पाऊस असल्याने काही क्षण भितीचे वातावरण होते की मुले नाटक बघण्यासाठी येतील की नाही ? पण पाऊस थांबताच पालकांनी आपल्या पाल्यांना नाट्यगृहामध्ये आणून सोडले. बालगोपाळांनी नाट्यगृहामध्ये तिन्ही मोफत नाटकाचा मनमुराद आनंद लुटला. आरडा-ओरडा केला, मजा मस्ती केली, धमाल करत नाटकाचा आस्वाद घेतला.

यासमयी शिवसेना उपनेते विजय साळवी, शिवसेना जिल्हाप्रमुख अल्पेश भोईर, दत्ता खंडागळे, राजू दिक्षित, विश्वनाथ जाधव, भागवत बैसाणे, सतीश वायचल, राजा महाले, बाळा मसुरकर, गुरु पानेरकर, अमोल गायकवाड, मारुती नागरे, सुरज पातकर, रुपेश भोईर, प्रवीण काबाडी, उदय गायकवाड, प्रदीप साळवी, श्याम नेमाने, संजय गुप्ता, सचिन सोष्टे, प्रथमेश पुण्यार्थी, सौरभ कुलकर्णी, अनिल डेरे यांचे सहकार्य लाभले. तसेच यावेळी महिला पुरुष शिवसेनेचे पदाधिकारी बालगोपाळांच्या सेवेस मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार मोरे यांची दुरावस्था झालेल्या रस्त्याची नागरिकांबरोबर फिरून पाहणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : नागरिकांच्या तक्रारींची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करत त्यांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना देत आपण नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठीच आमदार झाल्याचे पुन्हा एकदा कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी दाखवून दिले आहे.

पिसवली परिसरातील पिंगारा हॉटेलच्या मागील रस्त्याची दुरावस्था झाली असून गटारातील सांडपाणी रस्त्यावरून वाहत असल्याने नागरिकांना प्रचंड त्रास होत असल्या बाबतच्या तक्रारींची दखल घेत आमदार मोरे यांनी मंत्रालयातून परतताना कार्यालय किंवा घर न गाठता थेट पिसवली गाठली. आमदार आपल्या समस्यांची तक्रारीची दखल घेत येत असल्याचे कळताच नागरिकांनी आमदारांकडे व्यथा मांडण्यासाठी एकच गर्दी केली. आमदार मोरे यांनी दुरावस्था झालेल्या रस्त्याची नागरिकांबरोबर फिरून पाहणी करत या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबरोबरच गटारांची साफसफाई करण्याबाबतच्या सूचना अधिकाऱ्यांना तिथूनच फोनवरून दिल्या.

प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करू न देखील आपल्या तक्रारींची दखल घेण्यासाठी अधिकाऱ्यांना वेळ मिळत नाही मात्र आमदारांकडे केलेल्या तक्रारीनंतर आमदार स्वतःहून येत आमच्या समस्या जाणून घेतल्या त्या सोडविण्याचे आश्वासन दिल्याबद्दल नागरिकांनी आमदारांचे आभार मानले.

यावेळी आमदारांसोबत डोंबिवली शहर सचिव तथा विद्यानसभा क्षेत्रप्रमुख संतोष सिताराम चव्हाण आणि पिसवली येथील उपतालुकाप्रमुख विलास भोईर , शाखाप्रमुख जयेश माळी , उपविभागप्रमुख सुभाष पार्चा , कार्यकर्ते शिवसैनिक आणि नागरिक उपस्थित होते.

# पेणच्या सुहित जीवन ट्रस्ट प्रशिक्षण केंद्राला अनुदान मंजूर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्यातील पेण येथे सुहित जीवन ट्रस्ट संचलित एकलव्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्र या मतिमंद विद्यार्थ्यांच्या कार्यशाळेस ७५ अनिवासी विद्यार्थ्यांसाठी अनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात आली आहे. ही मान्यता आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

सुहित जीवन ट्रस्टतर्फे हे प्रशिक्षण केंद्र मार्च २०१२ पासून यशस्वीरित्या चालवले जात आहे. दिव्यांग कल्याण विभागाच्या १६ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार, अनुदानासाठी संस्थेचे किमान १५ वर्षांचे कार्यकाल आवश्यक आहे. मात्र, सुहित जीवन ट्रस्टच्या उपक्रमाची विशिष्ट गरज लक्षात घेऊन ही अट शिथिल करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे केंद्रातील ७५ अनिवासी विद्यार्थ्यांना शासनाच्या अनुदानाचा लाभ मिळणार आहे. याशिवाय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार शिक्षक आणि शिक्षकेत्तर अशा १४ पदांना मान्यता देण्यात आली असून, यासाठी दरवर्षी येणाऱ्या ५८ लाख ३७ हजार ९०८ रूपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व्यवसाय प्रशिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, त्यांच्या आत्मनिर्भरतेस चालना मिळणार आहे.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली, कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५-२६)
बारावीनंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
-बीएएमएमसी-
(बॅचलर ऑफ मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून बारावी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in
MASS MEDIA

# महाराणा प्रतापसिंह जयंती निमित्त भिवंडी महानगरपालिकेतर्फे अभिवादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे १८/०२/२०२५ चे परिपत्रक व भिवंडी महानगरपालिका मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा. प्र.से) यांच्या निर्देशानुसार दि.२९/०५/२०२५ रोजी महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मा. अति-आयुक्त श्री विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी उप-आयुक्त श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, सहा. आयुक्त श्री. नितिन पाटील, विभाग प्रमुख श्री. मिलींद पळसुले, श्री. अजित महाडिक, श्री. सुधीर गुरव, व इतर कर्मचारी या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोटरी क्लबचा घनवनीकरण हिरवाईसाठी मदतीचा हात

## उंबर्डे गावात ७०० झाडांची लागवड



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : वाढते शहरीकरण आणि काँक्रीटच्या जंगलात हरपलेल्या वनराई, हिरवाई चे महत्त्व मानवी जीवनासाठी टिकून ठेवण्यासाठी रोटरी क्लब कल्याण रिव्हर साइडच्या वतीने पर्यावरण रक्षणाचा संकल्प घेऊन घन वनीकरण प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली आहे. २६ मे रोजी उंबर्डे गावातील 'अमृत उद्यान' येथे ७०० भारतीय स्थानिक प्रजातींच्या झाडांची भव्य लागवड करून वनीकरण मोहिमेत मदतीचा हात देत हिरवाईचा वसा जोपसण्यासाठी सामाजिक बांधलिकी साठी आर्दश उपक्रम सुरू केला आहे.

या उपक्रमामागे क्लबचे अध्यक्ष योगेश कल्हापुरे यांचा पर्यावरण संवर्धनाचा दृढ निश्चय आहे. त्यांनी यावर्षी कल्याण परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून पर्यावरणाचा समतोल साधण्याचा संकल्प केला होता, ज्याची सुरुवात या लागवडीनिशी झाली. येत्या काही दिवसांत आणखी ३०० झाडे लावून एकूण १००० झाडांचे संगोपन पुढील तीन वर्षे करण्यात येणार आहे.

या अभियानात रोटरी क्लबसोबतच पर्यावरण गतविधीय, आरएसएस माधव नगर, अश्वमेध प्रतिष्ठान, पर्यावरण दक्षता मंच तसेच अनेक पर्यावरणप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे उपायुक्त संजय जाधव आणि वनस्पतीशास्त्र अभ्यासक भरत गोडांबे यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य प्रकल्पासाठी लाभले. हा प्रकल्प पुढील तीन वर्षे चालणार असून, झाडांची निगा आणि संगोपन या काळात सातत्याने केले जाणार आहे."पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने पुढे येण्याची गरज आहे. हा प्रकल्प केवळ रोटरीचा नाही, तर प्रत्येक कल्याणकराचा आहे," असे आवाहन अध्यक्ष योगेश कल्हापुरे यांनी केले आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज, हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

## रेसिपी
# चविष्ट दुधी भोपळ्याचा रायता



साहित्य-

दुधी भोपळयाचा किस - एक कप, दही - १.५ कप ,मीठ - चवीनुसार, भाजलेले जिरे पावडर -अर्धा टीस्पून, काळी मिरी पावडर - १/४टीस्पून ,हिरवी मिरची - एक ,कोथिंबीर

कृती-

सर्वात आधी दुधी भोपळयचा किस पाण्यात उकळवावा . तुम्हाला ते फक्त २ ते ३ मिनिटे उकळावे लागेल. आता थंड दही फेटून घ्या. यानंतर, दुधी भोपळ्याचा किस हाताने पिळून त्याचे पाणी काढा. ते चांगले पिळून झाल्यावर, फेटलेल्या दह्यात घाला, मीठ, भाजलेले जिरे आणि काळी मिरी घाला आणि मिक्स करा. चव वाढवण्यासाठी, तुम्ही वर बारीक चिरलेली कोथिंबीर आणि हिरव्या मिरच्या देखील घालू शकता. तर चला तयार आहे आपले दुधी भोपळ्याचे रायते.



## आजचे राशिभविष्य

मेष - तुमच्या वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवून तुम्ही भविष्यासाठी काही पैसे वाचवण्याची योजना आखू शकता. तुम्हाला तुमच्या आरोग्याबद्दल जागरूक राहावे लागेल.

वृषभ -तुम्ही तुमच्या कामाने जॉबच्या ठिकाणी तुमच्या वरिष्ठांना खूश कराल ज्यामुळे तुम्हाला नवीन पद मिळू शकते.

मिथुन - मच्या मुलाच्या लग्नाशी संबंधित कोणतीही अडचण तुम्हाला त्रास देत असेल तर कुटुंबातील सदस्याच्या मदतीने सोडवू शकाल.

कर्क - आयटी आणि बँकिंग क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या कारकिर्दीत आज पदोन्नती दिसेल. व्यवसाय करणाऱ्या लोकांसाठी आजचा दिवस थोडा कमकुवत राहणार आहे.

'सिंह - तुमच्या मनात चाललेल्या गोष्टी कोणाशीही शेअर करणे टाळावे लागेल अन्यथा ती व्यक्ती त्यांचा गैरफायदा घेऊ शकते. कुटुंबातील सदस्याकडून तुम्हाला चांगली बातमी ऐकायला मिळेल.

कन्या - तुम्ही भागीदारीत कोणताही व्यवसाय करण्याचा विचार करत असाल तर तो अजिबात करू नका तो भागीदार तुमची फसवणूक करू शकतो.

तूळ - तुमच्या दैनंदिन गरजांसाठी खरेदी करण्यासाठी तुम्ही आज पैसे खर्च कराल. तुम्ही भविष्यातील योजनांमध्येही गुंतवणूक करू शकता.

वृश्चिक -तुमच्या आरोग्यात काही बिघाड असेल तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका अन्यथा ते तुमच्यासाठी त्रासदायक ठरू शकते. रखडलेले काम पूर्ण होऊ शकते.

धनु -नोकरीत तुमच्या बढतीमुळे कौटुंबिक वातावरण आनंददायी असेल आणि एक छोटी पार्टी देखील आयोजित केली जाऊ शकते. उधार दिले पैसे तुम्हाला आज परत मिळू शकतात.

मकर -कोणतेही नवीन काम सुरू करण्यापूर्वी तुमच्या पालकांचा आशीर्वाद घ्या. तुमच्या आजूबाजूला होणाऱ्या कोणत्याही वादात तुम्ही अडकू नका.

कुंभ - कामाच्या ठिकाणी तुमच्या निर्णय क्षमतेचा तुम्ही पूर्ण फायदा घ्याल. नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना एखादी चांगली बातमी ऐकायला मिळू शकते.

मीन -तुमच्या कौटुंबिक नात्यात काही मतभेद चालू असतील तर तुम्ही दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून ते सोडवले तर तुमच्यासाठी चांगले होईल. दिवस चांगला लाभ घेऊन येणार आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# १४८ कोटीच्या अष्टविनायक विकास आराखड्यास मान्यता

**अजित पवार यांच्या नियोजन विभागाने मान्यता दिल्याने अष्टविनायक मंदिरांचा जीर्णोद्धार, आध्यात्मिक पर्यटनविकासाला गती मिळणार**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 28 :-** उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाने 147 कोटी 81 लाख रुपये खर्चाच्या 'अष्टविनायक गणपती मंदिरांचा जीर्णोद्धार व विकास आराखड्या'स सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून त्यासंबंधीचा शासननिर्णय आज जारी करण्यात आला आहे. अष्टविनायक विकास आराखड्यामुळे अष्टविनायक मंदिरांचा जीर्णोद्धार तसेच परिसराचा विकास होणार असून देवस्थानांना भेट देणाऱ्या भाविकांना, पर्यटकांना पायाभूत, नागरी सुविधा उपलब्ध होणार आहेत. अष्टविनायक क्षेत्रांच्या विकासामुळे राज्यातील आध्यात्मिक पर्यटनाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

अष्टविनायक मंदिरे जीर्णोद्धार व विकास आराखड्यास गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार सातत्याने प्रयत्नशील होते. यासंदर्भात मंत्रालयात सातत्याने संबंधीतांच्या बैठका घेऊन त्यांनी अष्टविनायक मंदिर जीर्णोद्धार आणि विकासाच्या कामांना गती देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे यासंबधीच्या प्रस्तावाला मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या माध्यमातून 6 मे 2025 रोजीच्या चौंडी येथील मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता घेण्यात आली. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर दोन आठवड्यातंच 147 कोटी 81 लाख खर्चाचा सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय आज जारी झाला. त्याबद्दल अष्टविनायक भक्तांकडून, स्थानिक नागरिकांकडून अजित पवार यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केलेली आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय दर्जाची महत्वाची स्थळे, तीर्थक्षेत्रे परिसर विकास आराखडे यांची व्याप्ती आणि स्वरुप लक्षात घेऊन संबंधीत आराखडे नियोजन विभागामार्फत राबविण्यात येतात. स्थानिक पातळीवरील संबंधित आणि तज्ज्ञांशी चर्चा करुन चौंडी स्मृतीस्थळ जतन व विकास व त्यास लागणाऱ्या निधीचा आराखडा तयार करण्यात येतो. त्यानुसार 2021-22 मध्ये 92 कोटी 19 लाखांचा आराखडा तयार करण्यात आला होता. त्यानंतर 2024 मध्ये 147 कोटी 81 लाखांचा सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आला. त्यास आज सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार, पुणे जिल्ह्यातील मोरगावच्या श्रीमयुरेश्वर मंदिरासाठी 8 कोटी 21 लाख, थेऊरच्या श्रीचिंतामणी मंदिरासाठी 7 कोटी 21 लाख, ओझरच्या श्रीविघ्नेश्वर मंदिरासाठी 7 कोटी 84 लाख, रांजणगावच्या श्रीमहागणपती मंदिरासाठी 12 कोटी 14 लाख रुपयांच्या खर्चास सुधारीत मान्यता देण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील महडच्या श्रीवरदविनायक मंदिरासाठी 28 कोटी 24 लाख, पालीच्या श्रीबल्लाळेश्वर मंदिरासाठी 26 कोटी 90 लाख रुपये खर्चास सुधारित मान्यता मिळाली आहे. अहिल्यानगरच्या श्रीसिद्धटेक मंदिरासाठी 9 कोटी 97 लाख रुपयांच्या खर्चास सुधारीत मान्यता देण्यात आली आहे. यासाठी एकूण शंभर कोटी 53 लाख रुपये खर्च करण्यात येणार असून विद्युतीकरण, रोषणाई, वास्तूविशारद, जीएसटी आदी खर्चासाठी 47 कोटी 39 लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाने 147 कोटी 81 लाख खर्चाला सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्यामुळे अष्टविनायक क्षेत्राच्या विकासाला गती मिळणार असून त्याबद्दल भाविकांकडून, नागरिकांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे



# सरकारी नोकरी हवी!
## पण सरकारी शाळेचे शिक्षण नको!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सरकारी नोकरी सर्वांनाच हवीशी वाटते! ती मिळवण्यासाठी अनेक प्रकारच्या स्पर्धात्मक परीक्षा देऊन ती नोकरी मिळवण्याचं तरुण-तरुणी अतोनात प्रयत्न करत असतात. शैक्षणिक क्षेत्राला आजच्या घडीला व्यवसायाचे स्वरूप प्राप्त होताना दिसत आहे; पूर्वी सर्व लहान मुले ज्यांचे व तीन ते सहा च्या आत मध्ये आहे अशी मुले मुली बालवाडी किंवा अंगणवाडीमध्ये खेळताना बागडताना दिसायची. सर्वजण आनंदात खिचडी, चणे, वटाणे लापशी, बिस्किट यांसारखे पदार्थ बालकांना अंगणवाडीत मिळायचे. आता देखील ते मिळत आहेत परंतु ते खाऊ खाण्यासाठी बालवाडी मध्ये मुलच पाहायला मिळत नाही. अशी परिस्थिती सरकारी शाळांची झाली आहे. आजच्या घडीला ग्रामीण व शहरी भागात सरकारी शाळांमध्ये मुलांची पटसंख्या ही दिवसेंदिवस कमी होताना दिसत आहे. पूर्वीच्या काळी लोकांसमोर अधिक पर्याय उपलब्ध नव्हते; त्यामुळे गावचे सर्वच मुले हे सरकार शाळांमध्ये शिकून मोठी झाली.

बरेचसे विद्यार्थी या सरकारी मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये शिकून अधिकारी बनले, डॉक्टर घडले, व्यावसायिक बनले, इंजिनियर झाले परंतु आजच्या घडीला हेच पालक आपल्यासमोर खाजगी शाळामध्ये दर्जेदार शिक्षण प्रणाली असल्यामुळे इंग्रजी माध्यमांची शाळांमध्ये आपल्या मुलांना अमाप पैसे खर्च करून प्रवेश मिळून देतात. परंतु त्या पाल्याला मराठी अवगत होत नाही ना धड इंग्रजी बोलायला जमत देखील नाही. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या सरकारी शाळा वाचल्या पाहिजेत. त्यात पुन्हा पहिल्यासारखे विद्यार्थी घडले पाहिजेत याकरता आपण सर्व नागरिकांना कटिबंध होऊन याबाबत जनजागृती करूया. मी देखील एक जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेऊन इथपर्यंत पोहोचलेला विद्यार्थी आहे. अनेक पालकांना वाटते की त्या सरकारी शाळेपेक्षा इंग्रजी माध्यमांच्या शाळेत अनेक सोयी सुविधा उत्तम दर्जेदार शिक्षण मुलांना खाजगी शाळांमध्ये मिळेल; सरकारी शाळेचे दर्जा खालावत चालला आहे. पण आपण जोपर्यंत पाठपुरा करून मागणी करत नाही तोपर्यंत प्रशासनाला देखील जाग येणार नाही यासाठी आपण देखील पुढाकार घ्यावा ज्या मराठी शाळेने आपणा सर्वांना घडवलं त्या शाळांना वाचवूया.

एसटी महामंडळाने एसटी विभागात नवनवीन बदल करून एसटी महामंडळाची शान असलेली लाल परी वाचण्याची काम केलं; त्याचं प्रमाणे आपण देखील पुढाकार घेऊन मराठी माध्यमांच्या शाळा वाचूया कारण याच त्या गोष्टी आहेत; जसे की एसटी, ग्रामीण रुग्णालय व सरकारी शाळा यांचा वापर सर्वसामान्य गरीब मध्यमवर्गीय आपले कष्टाचे पैसे बचत करण्यासाठी वापरत असतात त्यामुळे आपण यांचा पुरेपूर वापर केला पाहिजे. व काही त्रुटी असल्यास त्या प्रशासनाच्या निदर्शनात आणून देणे हे देखील आपलं कर्तव्य आहे. जर नोकरी सरकारी हवी आहे तर सरकारी आस्थापनांचा वापर देखील आपण केलाच पाहिजे.

# अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रिया आणि पगार बंदीला स्थगिती

**शिक्षक भारतीच्या पाठपुराव्याला यश**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई / दि. 29 : राज्यातील सर्व अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला शासनाने तूर्त स्थगिती दिली आहे. जिल्हा परिषदेच्या संदर्भात न्यायालयीन आदेश झाल्यानंतरही समायोजनाची प्रक्रिया सुरू होती. समायोजनास नकार दिलेल्या अतिरिक्त शिक्षकांचे पगारही थांबवण्यात आले होते. याबद्दल शिक्षण संचालक यांनी संचमान्यता, समायोजन आणि पगार बंदीला स्थगिती देण्याचे स्पष्ट आदेश जारी केले आहेत. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यासंदर्भात माजी आमदार कपिल पाटील, शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे आणि कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, शिक्षण सचिव रणजितसिंह देओल यांची भेट घेऊन, न्यायालयीन आदेशानंतरही समायोजन प्रक्रिया सुरू असल्याचे, पगार थांबवण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले. आरटीई कायद्यातील तरतुदी आणि महाराष्ट्र राज्य सेवा शर्ती नियमावली 1981 यांच्याशी विसंगत 15 मार्च 2024 चा शासन निर्णय असल्याचेही लक्षात आणून दिले होते. त्यानंतर आता शासनाने संचमान्यता आणि समायोजन प्रक्रिया थांबवल्याचे जाहीर केले आहे.

शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी संबधीत आदेश मुंबईसही लागू असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे शेकडो शिक्षकांचे पगार बंदीचे संकट तूर्तास दूर झाले आहे. याबद्दल सुभाष मोरे यांनी शिक्षण मंत्री, शिक्षण सचिव आणि शिक्षण संचालक यांचे आभार मानले आहेत.

शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांच्यासोबत आज झालेल्या बैठकीत समायोजनाची सगळीच प्रक्रिया थांबवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कोर्टाच्या निर्णयाची अवमानना होणार नाही, याबद्दल आदेश देण्यात आले आहेत. मुंबईतील शिक्षकांना मुंबई बाहेर अतिरिक्त करणे आणि वेतन स्थगिती या दोन्ही प्रक्रिया यामुळे तूर्त थांबतील असेही पालकर यांनी स्पष्ट केले. अधिक माहितीसाठी सुभाष मोरे यांना 9920933929 या क्रमांकावर संपर्क करावा.



## अभाविपच्या प्रतिनिधी मंडळाने घेतली पोलिस उप आयुक्तांची भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बुधवार दि.२८ मे २०२५ ह्या दिवशी, मा.पोलिस उप आयुक्तसो, कल्याण परिक्षेत्र 3 (DCP, Kalyan Zone 3) यांची, अभाविप कल्याण शहराच्या प्रतिनिधी मंडळाने भेट घेतली होती. कल्याण डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रातील, विशेषत: कल्याण पूर्वेतील, अवैध अंमली पदार्थ (Drugs) तस्करी व सेवनाचे वाढते प्रमाण, तसेच तत्पश्चात झुंडशाही, सामूहिक गुन्हेगारी आणि सदर प्रकारांना मिळणाऱ्या प्रोत्साहनावर जरब बसवित, संबंधित सर्व व्यवस्थेच्या समूळ उच्चाटनासाठी, शाश्वत उपाययोजना राबविल्या जाव्यात, अशा आशयाचे निवेदनही विस्तृत चर्चेअंती त्यांना सुपूर्द केले गेले होते.

# भिवंडी : मानेवर कटर चालवून कामगाराची हत्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. २९ (वार्ताहर):** मानकोली येथील लोढा अप्पर ठाणे येथील एका फ्लॅटमध्ये फर्निचरचे काम करणाऱ्या कामगारासोबत सहकारी अल्पवयीन कामाच्या क्षुल्लक कारणावरून भांडण झाले होते. याचा मनात राग धरून अल्पवयीन सहकाऱ्याने प्लायवूड कापण्याच्या कटरने गळा चिरून हत्या केली. कैसर अजगर अली (वय २२) असे हत्या झालेल्या कामगाराचे नाव आहे. तर हत्या करणाऱ्या अल्पवयीन मुलाची रवानगी बाल निरीक्षणगृहात केली आहे.

शहरातील ब्राह्मण आळी परिसरातील राहुल चंपालाल पारेख यांनी लोढा अप्पर ठाणे येथील कासा टिआरा या इमारतीच्या डी विंगमध्ये १६व्या मजल्यावर फ्लॅट्स खरेदी केला आहे. येथील फर्निचर बनवण्याचे काम सुरू आहे. बुधवारी (ता. २८) कैसर अजगर अली व त्याचा १५ वर्षे दोन महिने वयाचा अल्पवयीन सहकारी हे काम करीत होते. या वेळी त्यांच्यात झालेल्या क्षुल्लक वादातून अल्पवयीन सहकाऱ्याने प्लायवूड कापण्याच्या इलेक्ट्रिक कटरच्या साहाय्याने कैसर अजगर अली यांची गळा चिरून हत्या केला. याप्रकरणी माहिती मिळताच फ्लॅट्स मालक राहुल पारेख यांनी नारपोली पोलिस ठाण्यात तक्रार दिल्याने पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून अल्पवयीन आरोपीस ताब्यात घेतले आहे. त्याची भिवंडी बालनिरीक्षणगृह याठिकाणी रवानगी केली आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलिस निरीक्षक (गुन्हे) ज्ञानेश्वर कदम करीत आहेत.

# ठाणे मनपाच्या शिक्षण – परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** काल ४६ लिपिकांना पदोन्नती दिल्यानंतर ठाणे महानगरपालिकेने ४६ वरिष्ठ लिपिकांना उप अधिक्षक आणि महानगरपालिकेच्या सेवेतील ३८ उपशिक्षकांना (प्राथमिक विभाग, मराठी माध्यम) मुख्याध्यापक पदावर पदोन्नती दिल्याने कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या ३८ उपशिक्षक आणि ५३ वरिष्ठ लिपिकांची पदोन्नतीचे आदेश अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी बुधवारी काढले. त्यापूर्वी, मंगळवारी, वरिष्ठ लिपिक या पदावर ४६ जणांना, अग्निशमन प्रणेता (लिडिंग फायरमन) या पदावर १९ जणांना, तर सहायक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर दोन जणांना पदोन्नती देण्यात आली. आतापर्यंत एकूण १५८ जणांना पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नतीच्या या निर्णयांमुळे महापालिका कर्मचारी, शिक्षक यांच्यात आनंदाचे वातावरण असून त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे आभार मानले आहेत.

दरम्यान परिवहन सेवेतील वाहन चालक, वाहक अशा १०९ कर्मचाऱ्यांना देखिल पदोन्नती आणि ४७ जणांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात आली असल्याची माहिती ठाणे परिवहनचे महाव्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांनी दिली. मागील अनेक वर्षे अनुकंपा तत्वावरील वारस नोकरीच्या प्रतिक्षेत होते. त्यांना नोकरी मिळाल्याने त्यांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# टीमा हॉस्पिटल बाबत सद्यस्थिती कायम ठेवा - जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघरः** बोईसर येथील ग्रामीण रुग्णालय सुरू असलेले ठिकाण अर्थात पूर्वीचे टीमा हॉस्पिटलची जागा हॉस्पिटलच्या धर्मदाय संस्थेला पुन्हा मिळावी यासाठी केलेल्या प्रयत्नांसंदर्भात बोईसरच्या विविध पक्षातील नेत्यांनी पालघरच्या जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन सुरू असलेले ग्रामीण रुग्णालय बोईसर येथे पर्यायी व्यवस्था उभी राहीपर्यंत सुरू ठेवण्याची मागणी केली. सध्याची मान्सून परिस्थिती व शहरी भागात करोनाचा झालेला शिरकाव पाहता रुग्णालयाची सद्यस्थिती कायम ठेवण्या संदर्भात सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. टीमा हॉस्पिटल व्यवस्थापनाने करोना काळात जिल्हा शल्य चिकित्सक यांना कोविड रुग्णालय उभारण्यासाठी दिलेली वास्तू आपल्याला परत मिळावी अशी मागणी अनेकदा केली होती. तसेच गेल्या दोन अडीच वर्षांपासून त्या ठिकाणी बोईसर ग्रामीण रुग्णालय सुरू असल्याने आपल्याला प्रति महिना १० लाख रुपयांचे भाडे मिळावे अशी मागणी देखील जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती.

# चक्कीनाका परिसरात वाहतूक सिग्नल बंद
## ठाकरे गटाकडून आंदोलनाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. २९ :** कल्याण पूर्वेतील चक्की नाका येथे मागील काही काळापासून मुख्य वाहतूक सिग्नल बंद अवस्थेत आहे. यामुळे दररोज सकाळी आणि सायंकाळी प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. रस्त्यावरील प्रवास अतिशय त्रासदायक बनला आहे. सिग्नल बंद असल्याने वाहनचालक, पादचारी, शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. यावर वाहतूक विभागाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी ठाकरे गटाने केली आहे.

कल्याण पूर्वेतील चक्कीनाका परिसरातील सिग्नल यंत्रणा बंद आहे. यामुळे येथे वाहन कोंडीची समस्या निर्माण होते. वाहनचालकांना कोणती ही शिस्त नसल्याने वाहने अडकून पडतात. तसेच अपघाताचे प्रमाण वाढण्याची भीती आहे. स्थानिक नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या परिस्थितीकडे वाहतूक विभागाने गांभीर्याने पाहून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत तातडीने आवश्यक पावले उचलावीत, अशी सर्व नागरिक, स्थानिक व्यापारी. शाळा व्यवस्थापन आणि सामाजिक संस्थांची कळकळीची मागणी आहे. ठाकरे गटाचे ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी या समस्येकडे लक्ष वेधत यावर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

**आंदोलनाचा इशारा**

मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १९ (फ) नुसार सार्वजनिक वाहतुकीचा सुरक्षित आणि सुरळीत प्रवाह राखणे आवश्यक आहे. या अनुषंगाने, चक्कीनाका परिसरातील कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी वाहतूक विभागाकडे काही मागण्या केल्या आहेत. त्यात वाहतूक सिग्नलची त्वरित दुरुस्ती करावी, वाहतूक नियंत्रणासाठी पोलिस कर्मचारी तैनात करावेत, वाहनचालकांसाठी सूचना फलक लावण्यात यावेत अशी मागणी केली आहे. चक्कीनाका येथे जर वेळेत कार्यवाही झाली नाही, तर आंदोलनात्मक भूमिका घेतली जाऊ शकते, असा इशाराही मुंडे यांनी दिला आहे.




# पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात विशेष करोना कक्ष
## करोनाच्या पार्श्वभूमीवर मिरा भाईंदर महापालिका सज्ज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :-** राज्यभरात विविध ठिकाणी करोनाचे रुग्ण आढळून येत आहेत. याच पार्श्वभूमीवर मिरा भाईंदर महापालिका सज्ज झाली आहे. शहरात करोना बाधित रुग्णांनावर उपचार करण्यासाठी पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात विशेष करोना कक्ष उभारला जाणार आहे. खबरदारीच्या दृष्टीने प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.

मुंबईसह उपनगर मागील काही दिवसापासून करोनाबाधित रुग्ण आढळून येऊ लागले आहेत. त्यामुळे या आजाराचा धोका पुन्हा मिरा भाईंदरला निर्माण झाला आहे. सध्या शहरात एकही करोना बाधित रुग्ण आढळून आला नसला तरी येत्या दिवसात तो आढळणार असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे खबरदारीच्या दृष्टीने



येथील यंत्रणा देखील सतर्क करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाकडून घेण्यात आला आहे.

यात भाईंदर पश्चिम येथील पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात एक स्वतंत्र करोना कक्ष उभारण्याचे निश्चित करण्यात आले असल्याची माहिती महापालिकेचे मुख्य आरोग्य अधिकारी तुषार पडवळ यांनी दिली आहे. यात रुग्णांचे विलगीकरण व अलगीकरण केले जाणार आहे. याशिवाय शहरातील महापालिकेच्या रुग्णालय व आरोग्य केंद्रात तसेच खासगी रुग्णालय व दवाखान्यांत करोना बाधित रुग्ण समोर आल्यास त्याची माहिती तातडीने प्रशासनाला देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**आयुक्तांकडून रुग्णालयांची पाहणी**

करोनाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभाग व रुग्णालयाची महापालिका आयुक्त राधा विनोद शर्मा यांनी मंगळवारी पाहणी केली. यावेळी आरोग्य विभागाचे कर्मचारी व अधिकारी यांना सतर्क राहण्याच्या सूचना केल्या. याशिवाय तेथील यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली असल्याचे पाहून समाधान ही व्यक्त केले.

# पहिल्याच पावसात उरण शहर आणि तालुक्याची दैना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरणः** सोमवारी झालेल्या पहिल्याच पावसाने उरण शहर आणि तालुक्याची दैना झाली. समुद्राच्या भरतीचे आणि पावसाचे पाणी एकत्र आल्यानंतर कोणती उपाययोजना करायची याचे नियोजन आजपर्यंत करण्यात आलेले नाही. परिणामी काही तास झालेल्या पावसाने दाणादाण उडविली.

येथील अनेक ग्रामपंचायतींच्या दुर्लक्षपणामुळे अद्यापही अनेक ठिकाणी मान्सूनपूर्वी नालेसफाईच्या कामांना सुरुवात झालेली नाही. उरण परिसरातील सुमारे १६ गावे पावसाळ्यात पाण्याखाली येण्याचा धोका निर्माण झाला आहे. जेएनपीएच्या हद्दीत जसखार, सोनारी, साठरखार, करळ, नवीन शेवा, हनुमान कोळीवाडा ही गावे येतात.

या गावांबाहेर असलेले लहान, मोठे नाले व गटारांची सफाई जेएनपीएमार्फत केली जाते. मात्र, कोट्यवधींचा निधी खर्च केल्यानंतरही मान्सूनपूर्व कामात अक्षम्य हलगर्जीपणा होत असल्याने मात्र दरवर्षी भरतीवेळी मुसळधार पाऊस झाल्यास गावांत पाणी शिरते.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta

https://www.facebook.com/jeevandeepnews

https://www.instagram.com/thane_jeevandeep

https://jeevandeepvarta.com

# जी एस महानगर बँक पंचवार्षिक निवडणूक जाहीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जी एस महानगर बँक पंचवार्षिक निवडणूक २०२५ जाहीर होऊन ती अंतिम टप्प्यात आली असून प्रचाराचा जोर वाढला असून जी एस महानगर बँक पंचवार्षिक निवडणूक २०२५ मध्ये सुमन गुलाबराव शेळके यांचे एक पॅनल व गीतांजली शेळके यांचे एक पॅनल असून सासू व सून यांच्या मध्ये थेट लढत असून खरा वारसदार कोण व हि बँक चालविण्यासाठी सक्षम,कणखर नेतृत्व कोण हाच प्रचाराचा मुद्दा असून दोन्ही पॅनल कडून दावे प्रतिदावे केले जात असून मतदारांना वळविण्यासाठी दोन्ही पॅनल कडून सर्वातो प्रयत्न होत असून निवडणूक रंगतदार स्थितीत पोहचली आहे.

गुलाबराव शेळके व चिरंजीव उदय शेळके यांच्या निधनानंतर २०१० नंतर प्रथमच निवडणूक लागली असून ७० शाखा असलेली जी एस महानगर बँक हि महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रातील पटलावर विशाल असं स्वरूप बनविण्यात यशस्वी झाली आहे. अ.नगर जि, पारनेर तालुक्यातून सुरू झालेला प्रवास महाराष्ट्रात पोहचला असून ७० शाखा आहेत. दि.१ जून २०२५ रोजी मतदार आपले मतदान कोणाच्या पारड्यात टाकतील व विजयाचा गुलाल कोण उडवणार हे २ जून रोजी समजेल.

दरम्यान आम्ही नगरकर प्रतिष्ठान मुंबई संघ ने जी एस महानगर बँक चा कार्य व विशाल असं स्वरूप पाहून गीतांजली शेळके यांच्या नेतृत्वा वर विश्वास दाखवत समर्थन दिले असून सर्व बँकेच्या सभासदांनी, मतदारांनी गीतांजली शेळके यांच्या पॅनल ला म्हणजे सॉलिसिटर गुलाबराव शेळके संस्थापक पॅनलला *कप बशी* या चिन्हावर आपले मत देवून सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने मतांनी विजयी करावे असे आवाहन आम्ही नगरकर मुंबई संघ व स्फूर्ती फाउंडेशन पदाधिकारी वतीने करण्यात आले आहे.

# भिवंडीतील ट्रॅफीक समस्येचे निराकरण करण्याकरिता कृती समितीची आढावा बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहरातील वाहतुक कोंडीवर उपाययोजना करण्याकरिता दिनांक 06.03.2025 रोजीच्या बैठकीमध्ये पोलीस विभाग आणि महानगरपालिका अधिकारी यांची कृती समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीची आज दिनांक 28.05.2025 रोजी बैठक पार पडली. या बैठकीमध्ये प्रामुख्याने शहरातील अनधिकृत, विनापरवाना रिक्षांवर परिवहन विभागामार्फत सुरू असलेल्या कारवाईचा आढावा घेण्यात आला. महानगरपालिका, पोलीस विभाग आणि परिवहन विभाग यांनी एकत्रित पहाणी करुन शहरामध्ये नो पार्कींग, दिशा दर्शक फलक लावणेबाबत चर्चा करण्यात आली. शहरामध्ये मंजूर रिक्षा स्टँडवर एका वेळी किती रिक्षा उभ्या राहु शकतात याची पहाणीकरुन त्यानुसार मार्कींग करण्याच्या सुचना दिल्या. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील महानगरपालिकेचा वाहनतळ चालविण्यासाठी निविदा प्रसिद्ध करण्याची कार्यवाही लवकरात लवकर करावी. शहरामध्ये शासनाकडुन सी.सी. टि.व्ही. बसविण्याचे काम सुरू असून ते 1 महिन्यामध्ये पुर्ण होणार असल्याबाबत पोलीस विभागाने स्पष्ट केले. एस. टी. महामंडळाने भिवंडी बस स्थानकामध्ये रिक्षा पार्कींगसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले. स्व. राजीव गांधी उड्डाणपुल आणि हिंदुहृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुल येथुन उलट दिशेने येणाऱ्या वाहनांना प्रतिबंध करणे आणि त्यांच्यावर दंड आकारणेबाबत कारवाईच्या सुचना संबधितांना दिल्या. तसेच, खाजगी टेम्पो, ट्रक, जीप सार्वजनिक जागेवर लावणेबाबत पोलीस विभागाने प्रतिबंधक कारवाई करावी. अंजूरफाटा चौक हा ग्रामीण भागात येत असुन, तेथील अतिक्रमण हटविण्यासाठी महूसल विभाग, पोलीस विभाग यांचेसोबत महानगरपालिका अधिकाऱ्यांनी समन्वय साधून कारवाई करावी. जेणेकरुन त्या भागात कोणत्याही प्रकारे वाहतुक कोंडी होणार नाही.

या बैठकीस मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, उपायुक्त (मालमत्ता) श्री. बाळकृष्ण क्षीरसागर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. रोहीत काटकर, सहायक संचालक नगररचना श्री. अजय साबळे, शहर अभियंता श्री जमील पटेल, पोलीस निरीक्षक (वाहतूक) कोनगाव, भिवंडी, नारपोली, एस. टी. महामंडळाचे अधिकारी श्री. जाधव, प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र. 1-5, आणि पाणीपुरवठा, बांधकाम, नगररचना या विभागाचे अभियंते, संबंधित विभागप्रमुख उपस्थित होते.

# विकसित कृषी संकल्प अभियानाचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणात विकसित कृषी संकल्प अभियानाचे दि.29 मे ते दि. 12 जून 2025 या कालावधीत 15 दिवस राबविण्यात येणाऱ्या अभियानाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते आज हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.

यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे सह्योगी अधिष्ठाता डॉ. शैलेश इंगोले, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कृषी विज्ञान केंद्र ठाणे, डॉ. सुरेश जगदाळे तसेच कृषी विज्ञान केंद्राचे विषय तज्ञ डॉ. सलील हंडे, डॉ.मयुरा गोळे, डॉ.संग्राम चव्हाण, डॉ.संजय कदम, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे, तहसिलदार रेवण लेंभे, तहसिलदार सचिन चौधर व अन्य कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाप्रसंगी शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ होण्यासाठी शेतकऱ्यांसाठी बनविलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते संपन्न झाले. विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत दि.29 मे 2025 ते दि. 12 जून 2025 या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 90 गावांमध्ये मुरबाड, कल्याण, शहापूर, भिवंडी, अंबरनाथ तालुक्यातील दररोज 6 गावांमध्ये शेतकऱ्यांच्या घरोघरी जावून भेट घेण्यात येणार आहे. या शेतकऱ्यांना ही माहिती पुस्तिका देण्यात येणार आहे. या पुस्तिकेमध्ये शेळीपालन, मूर घास कसा बनवावा, यशस्वी दुग्धव्यवसाय शास्त्रोक्त पध्दतीने करण्याबाबत, संकरित चारा लागवड कसा करावा, परंपरागत कृषी विकास योजना, सेंद्रीय शेतीकरिता जैविक खते व पीक संरक्षण औषधे, शास्त्रोक्त पध्दतीने वासरांचे आहार व्यवस्थापन, निकृष्ठ चाऱ्याची प्रत वाढविण्यासाठी खाद्य प्रक्रिया तंत्रज्ञान, लंपी चर्मरोगग्रस्त जनावरांची करावयाची सुश्रुषा, मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प कृषी मूल्य साखळी विकासाचा उपक्रम, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (पीएम किसान) योजनेचे स्वरुप, ॲग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना मिळणार ओळख क्रमांक आदी विषयक माहिती शेतकऱ्यांना होण्यासाठी जनजागृती वाहनांद्वारे प्रसिध्दी करण्यात येत आहे. या मोहिमेची मुख्य वैशिष्टे समृध्द शेतकरी राष्ट्रीय अभियानामध्ये खरीप पिकांसाठी नवीनतम तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना देणे, नैसर्गिक (सेंद्रिय) शेती पध्दतींना प्रोत्साहन देणे, माती आरोग्य कार्डावर आधारित पीक निवडीचे मार्गदर्शन करणे, खतांचा संतुलित वापर करण्यास प्रोत्साहन देणे, आयसीटी साधने आणि आधुनिक उपकरणांचा वापर करुन स्मार्ट शेतीला प्राधान्य देणे, शेतकऱ्यांपर्यत सरकारी योजनांची व्यापक पोहोच सुनिश्चित करणे, कृषी ड्रोनचे थेट प्रात्यक्षिक, पीक विविधीकरण आणि यंत्रावर आधारित शेतीचे मॉडेल, शेतकरी आणि कृषी शास्त्रज्ञांमधील थेट संवाद, शेतकऱ्यांच्या नवोपक्रमांना प्रोत्साहन आदी विषयांवर शेतकऱ्यांसाठी ही जनजागृती सुरु आहे.




# जिल्हा परिषद शाळा ते इस्त्रोत शास्त्रज्ञ खेडेगावच्या सुजाताची गरुड भरारी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : ठाणे जिल्ह्याच्या शहापूर तालुक्यातील शिरगांव या लहानशा गावातील सुजाताची ही गरुडझेप ठाणे जिल्ह्यात कौतुकाचा विषय बनला आहे.सुजाता रामचंद्र मडके हिची इंडियन रिसर्च सेंटर (इस्रो) मध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली आहे.सुजाताच्या संशोधनातून ठाणे जिल्ह्याचा झेंडा आता इस्रोमध्येही झळकणार आहे.प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे येथील सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक पदाचा राजीनामा देऊन भारतीय अंतराळ संशोधन संस्था ( इस्रो ) बेंगलुर (कर्नाटक) येथे शास्त्रज्ञ (राजपत्रित अधिकारी) या पदावर सुजाता रुजू झाली.

इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण शिरगांव जिल्हा परिषद शाळेत झालेल्या सुजाताचा प्रेरणादायी प्रवास आहे.सुजाताने शहापूर येथील ग. वि.खाडे विद्यालयात माध्यमिक शिक्षण पूर्ण करुन नंतर तिने भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आयआयटी) खरगपूर येथे मिनिस्ट्री ऑफ




एज्युकेशनच्या कार्यक्रमांतर्गत व्हर्च्युअल लॅब प्रोजेक्ट -३ मध्ये रिसर्च इंजिनिअर म्हणून काम केले आहे.ठाणे जिल्हा परिषदेत वरिष्ठ लिपिक पदावर काम करणारे रामचंद्र मडके आणि गृहिणीच्या भुमिकेत असलेल्या आई सविता या दाम्पत्याने आपली भूमिका चोख पार पाडली.यापुर्वी सुजाताची सहाय्यक अभियंता म्हणून महाजेन्को मध्ये निवड झालेली होती.संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (डीआरडीओ) मध्ये सायंटिस्ट - बी पदाच्या मुलाखतीपर्यंत आणि भाभा अणु संशोधन केंद्र (बीएआरसी), ट्रॉम्बेच्या टेक्निकल ऑफिसर पदाच्या मुलाखतीपर्यंत तिने धडक मारलेली आहे.तसेच महाराष्ट्र लोक सेवा आयोगाची (एमपीएससी) परीक्षेत यश संपादन करुन प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) ठाणे येथे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक या पदावर कार्यरत होती.दरम्यान नुकतेच ती भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो),बेंगळुरूमध्ये सायंटिफिक ऑफिसर ( एसओएससी ) या पदावर रुजू झालेली असून तिचे पद पे मॅट्रिक्समध्ये लेव्हल १० इतक्या उच्च दर्जाचे आहे.

**इस्रोच्यावतीने सुजाताला मिळालेल्या संधीचा सार्थ अभिमान आहे.तिच्या या यशाने आपल्या जिल्ह्याचे नाव संशोधन संस्थेत पोहचेल ही देखील आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. आपल्या देशाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पामध्ये तिच्या हातून मोलाचे कार्य व्हावे आणि तिची उत्तरोत्तर प्रगती होत राहो अशी अपेक्षा व्यक्त करतो.-प्रकाश पाटील, नेते शिवसेना नेते तथा व्हा. चेअरमन जी. पी. पारसिक बँक.**

**मला ईस्त्रोपर्यंत पोहोचता आले याचा मला आनंद आहे. शाळा, महाविद्यालयातील शिक्षकांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे होते.आईवडिल माझ्यामागे ठाम पणे उभे राहिले. त्यांनी केलेले संस्कार व मार्गदर्शन यामुळेच मला ईस्त्रोपर्यंत पोहचता आले.- सुजाता रामचंद्र मडके.**

# खर्डी ग्रामपंचायतीला पूर्ण वेळ ग्रामविस्तार अधिकारी द्या - मनसे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापुर : खर्डी ग्रापचे सद्या कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी एम.बी.परमर यांच्याकडे अजनुप ग्रुप ग्रापचा कार्यभार असल्याने खर्डी ग्राप मधील नागरिकांना शैक्षणिक दाखले,विवाह दाखला,नवीन घरकुल नोंदणी,बांधकाम विषयक मार्गदर्शन ,जन्म-मृत्यू दाखला मिळवण्यासाठी वारंवार ग्रापकडे हेलपाटे मारावे लागत असून संबंधित ग्रामविकास अधिकारी दोन ग्रापचा कार्यभार असल्यानेउपलब्ध होत होण्यास अडचण येत असल्याने खर्डीतील नागरिकांची गैरसोय होत आहे.ग्राप ची आजमितीला 10 हजाराच्या आसपास लोकसंख्या असून दिवसेंदिवस नागरिकीकरण होत असल्याने रहिवाश्यांना रोज कागदपत्रांची नवनवीन समस्या उदभवत आहे. खर्डीतील नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी खर्डी ला कायमस्वरूपी स्वतंत्र ग्रामविकास अधिकारीची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी मनसेचे खर्डी शहरप्रमुख सगीर शेख यांनी शहापुरचे गटविकास अधिकारी नम्रता जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळीमनसेचे जेष्ठ नेते प्रकाश धाबे उपस्थित होते.

## डी.वाय.फाऊंडेशनच्या माध्यमातून
# भिवंडीत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : 10 व 12 वी शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थीना शालेय उपयोगी वस्तू त्याचबरोबर शैक्षणिक दाखले,आधारकार्ड वाटप करण्याचा कार्यक्रम डी.वाय. फाउंडेशनचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांच्या उपस्थितीत भिवंडीत करण्यात आला,

यावेळी मोठ्या संख्येने शालेय विद्यार्थी व पालक वर्ग,जेष्ठ नागरिक, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.

रायगड व ठाणे जिल्ह्यात सामाजिक कार्य करणाऱ्या डी.वाय. फाऊंडेशनचे प्रदेशाध्यक्ष तथा कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांच्या पुढाकाराने दरवर्षी शालेय गुणवंत विद्यार्थीना वह्या,पुस्तके, गणवेश, छत्री त्याच बरोबर शासकीय शैक्षणिक दाखले शालेय उपयोगी विविध वस्तूंचे वाटप केले जाते यंदा सुध्दा हा कार्यक्रम त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आला होता.यावेळी माजी सरपंच दत्तात्रय सुतार,संतोष काकडे, तुकाराम बजागे, योगेश जाधव, नारायण मोगरे, अभिमन्यू पाटील,भरत मढवी, नवनाथ सुतार,युवा नेते विरेन चोरघे,पत्रकार किशोर पाटील,तलाठी गणेश पाटील, फाऊंडेशन महिला प्रदेश अध्यक्ष प्रियंका चोरघे, उपस्थित होत्या,

भिवंडी तालुक्यातील बापगांव पडघा येथील कार्यालयात डी.वाय. फाऊंडेशन संस्थेचा 14 वा वर्धापन दिनानिमित्त हा उपक्रम करण्यात आला. भिवंडी तालुक्यातील पडघा,आमणे-लोनाड रांजणोली,पिंपळास व सरवली परिसरातील दहावी व बारावीच्या 350 हुन अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव यावेळी करण्यात आला.तसेच ज्येष्ठ नागरिकांसह विद्यार्थ्यांसाठी आधार कार्ड व पॅन कार्ड शिबिर व जैन रियालिटी माध्यमातून रक्तदान शिबिराचे सुध्दा आयोजन करण्यात आले होते.जीवनात प्रगती करण्यासाठी चांगला अभ्यास व सामाजिक कार्य करणे आवश्यक त्यातून प्रत्येकाला उत्तुंग यश प्राप्त होते असे मत यावेळी डि.वाय फाऊंडेशनचे प्रदेशाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी व्यक्त करीत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विरेन चोरघे,योगेश पाटील,दीपक केणे मेहनत घेतली तर कार्यक्रम सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मनोहर तरे यांनी केले.

## भिवंडीत पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर
# अग्निशामक व आपत्कालीन विभागाचा तलावात बचाव सराव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : पावसाळयात सर्वाधिक सतर्क रहावे लागते ते म्हणजे आपत्ती व्यवस्थापन विभागाला. पावसाळयातील आपत्तीजनक पूरपरिस्थीचा सामना करताना पुरमध्ये अडकून पडणाऱ्या नागरिकांचा जीव वाचविणे महत्त्वाचे असून त्याचा सराव व्हावा यासाठी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. अनमोल सागर यांनी निर्देश दिल्यानंतर वऱ्हाळ तलाव या ठिकाणी भिवंडी अग्निशामक दल व आपत्ती व्यवस्थापन विभागातील कर्मचाऱ्यांनी (सराव) मॉक ड्रिल केले. अग्निशामक विभाग प्रमुख राजेश पवार यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या मॉक ड्रिल मध्ये पूरस्थिती मध्ये नागरिकांची तत्काळ मदत व स्थलांतर कसे करावे याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांसह परिसरातील नागरिकांना अशा आपत्तीजनक परिस्थिती मध्ये काय सावधानता बाळगायची याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. या मॉक ड्रिल मध्ये अग्निशामक दलासोबत, आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य विभाग तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांनी सहभाग घेतला.

**नियमित वाचा दैं. ठाणे जीवनदीप वार्ता**

# महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती दिनी महानगरपालिकेतर्फे अभिवादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराणा प्रतापसिंह यांचे जयंती दिनी आज महापालिकेतर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालयात उप आयुक्त संजय जाधव यांनी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपस्थित कार्यकारी अभियंता अशोक घोडे, सुरक्षा अधिकारी भारत बुळे, सहा. सुरक्षा अधिकारी सुरेश पवार, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर, वैद्यकीय अधिकारी डॉ विनोद दौंड व सहा.जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत, तसेच महापालिकेतील इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले. यावेळी इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# सर्वसामान्यांसाठीच्या शासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी
## - पालक सचिव गोविंदराज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : रायगड जिल्हा विविध योजनाच्या अंमलबजावणीमध्ये अग्रेसर जिल्हा आहे. विविध विभागांतील अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय आणि सहकार्याने काम केल्यास सर्वसामान्याचे जीवन सुकर होण्यास मदत होणार आहे. तरी शासनाच्या सर्व योजनाची प्रभावी अंमलबजावणी करावी असे निर्देश नगर विकास विभागाचे प्रधान सचिव तथा रायगड जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. के. गोविंदराज यांनी दिले.

पनवेल येथील तहसीलदार कार्यालयात पालक सचिव डॉ.गोविंदराज यांच्या अध्यक्ष तेखाली रायगड जिल्ह्यातील विविध विभागाच्या योजनाची आढावा बैठक आज घेण्यात आली. या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे, उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.







'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Registration No. THC/256/2022-2024